# धावत्या गाडीवर सिनेस्टाईल दरोडा ८ लाखांची बॅग लुटणारे ७ आरोपी जेरबंद

## रावेर गुन्हे शोध पथकाची कारवाई

प्रतिनिधी । रावेर

**बऱ्हाणपूर येथील मसाला व्यापाऱ्याची धावत्या गाडीवर सिनेस्टाईल अडवून ८ लाख रुपयांची रोकड लुटणाऱ्या सात संशयित आरोपींना रावेर गुन्हे शोध पथकाने अटक केली आहे. तर मुख्य आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला आहे.**




बऱ्हाणपूर येथील मसाला व्यापारी दीपक सुरेश वर्मानी यांनी दि.६ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या दुकानातील कर्मचारी गौरव वाघ व तौफिक तेली यांना सावदा, फैजपूर व रावेर येथे मालाच्या वसुलीसाठी पाठवले होते. रात्री सुमारे ९ वाजता खानापूर आरटीओजवळ अज्ञात ८ ते १० इसमांनी त्यांची गाडी अडवून रोकड भरलेली बॅग हिसकावून नेल्याची माहिती त्यांनी फोनद्वारे दिली.

याप्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रात्रीची वेळ आणि सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपींचे चेहरे स्पष्ट न दिसल्याने तपासात अडचणी निर्माण झाल्या.

रावेर, सावदा व फैजपूर येथील एकूण १६ सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तपासादरम्यान फिर्यादीच्या हालचालींवर दिवसभर लक्ष ठेवून गुन्हा केल्याचा संशय बळावला. पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार फारुख शेख रईस, अताउल्लाह खान दाऊद खान, शेख सईद शेख कादर, शेख समीर शेख कलीम, राहील खान दाऊद खान, सोमान खान अय्युब खान व अक्रम खान इस्माईल खान (सर्व रा. बंडू चौक, रावेर) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. मुख्य आरोपी शेख हसन उर्फ हसन फावड्या (रा. रुस्तम चौक, रावेर) फरार असून तो सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपींकडून २ मोटारसायकली व २ लाख ५५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नरवणे, उपअधीक्षक अनिल बडगुजर व अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

### • मुख्य आरोपी फरारच

रावेर पोलिसांना बऱ्हाणपूर येथील व्यापाऱ्याची बॅग सिनेस्टाईल अडवून त्यांच्याकडील बॅगमधील ८ लाखांची रोकड लुटणारी टोळी जेरबंद केली असली तरी पोलिसांपुढे केवळ मुख्य आरोपी जेरबंद करणे मोठे आव्हान आहे. मुख्य आरोपी सराईत गुन्हेगार असल्याने तो सापडल्यास अजून या टोळीने जिल्हाभरात कोणते गुन्हे किंवा लूट केली आहे का? याबाबतची उकल होणार आहे. त्यामुळे फरार शेख हसन फावड्याला जेरबंद करणे गरजेचे आहे.

# चोपड्यात बसपाचे नगराध्यक्षांना निवेदन



प्रतिनिधी । चोपडा

बहुजन समाज पार्टीच्या वतीने चोपडा नगर परिषदेकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात शहरातील मूलभूत सुविधा व महापुरुषांच्या सन्मानासंदर्भात महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनानुसार, चोपडा नगर परिषद हद्दीतील बेघर व अतिक्रमणधारकांना जमिनीचे पट्टे देऊन घरकुल योजना मंजूर करावी, शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जुनाट व अर्धाकृती पुतळ्यांऐवजी नवीन, सुसज्ज पूर्णाकृती पुतळे उभारावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### • बेघरांना घरकुल, पूर्णाकृती पुतळे व पाणीपुरवठा सुधारण्याची मागणी

यासोबतच कर्तव्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, ज्या भागांत पाणीपुरवठा अपुरा आहे, तेथे योग्य दाबाने पाणी सोडण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागू नये, अशीही मागणी करण्यात आली. निवेदनावर जळगाव जिल्हा महासचिव सचिन अशोक बाविस्कर यांच्यासह संजय पीरा अहीरे, विजय धुडपू रुपवते, अनिल गोरख वाडे, के. के. गंगावणे, वसंत वाल्हे, राहुल सिरसाट, सुकदेव कीसन बाविस्कर आदींच्या सह्या आहेत.

## थोडक्यात

### जवाहर नवोदय विद्यालयातर्फे भानखेडे शाळेत साहित्य वाटप

**भुसावळ ।** तालुक्यातील भानखेडे येथील शाळेत पीएम श्री शाळा जवाहर नवोदय विद्यालय मार्फत जोगलखेडे व भानखेडे येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्राचार्य आर. आर. खंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली कम्युनिटी मोबिलायझेशन उपक्रमांतर्गत जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनी भक्ती काळभीरे, अनुष्का पाटील, अश्विनी कोळी, कार्तिकी पाटील, ओजस्वी पाटील, हर्षदा सोनवणे व यशश्री पवार यांनी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व या विषयावर नाटिका सादर केली.

### महामार्गावरील उघड्या विहिरींमुळे अपघाताचा धोका

**भुसावळ ।** हायवेलगतच्या उघड्या विहिरीमुळे अपघाताचा धोका फेकरी, ता. भुसावळ । वार्ताहर फेकरी येथील सर्वे नं. ३६/१, प्लॉट नं. १२ शेजारील मोकळ्या जागेत खोल स्वरूपाची विहीर असून ती थेट हायवेच्या लगत आहे. संबंधित ठिकाणी कोणत्याही प्रकारचे संरक्षण कठडे किंवा सुरक्षाव्यवस्था नसल्याने गंभीर अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रात्रीच्या वेळी अंधार असतो. त्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना विहिरीचा अंदाज येणे कठीण झाले आहे .

# पाचोऱ्यात तलवार घेऊन दहशत माजवणाऱ्यास अटक

प्रतिनिधी । पाचोरा

**शहरातील जारगाव चौफुली परिसरात धारदार तलवार घेऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एका तरुणास च्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. शस्त्र अधिनियमांतर्गत आठवड्यातील ही सलग दुसरी कारवाई असल्याने पोलिसांच्या दक्षतेची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे.**



जळगाव जिल्ह्यात शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलिस निरीक्षक यांनी गुन्हे शाखेला सतर्कतेचे आदेश दिले होते.

दरम्यान, जारगाव चौफुली येथे एक इसम तलवार घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. तत्काळ पथकाने घटनास्थळी धाव घेत संशयितास ताब्यात घेतले. सोमनाथ बना पाटील (वय १९, रा. हनुमान नगर, पाचोरा) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव असून त्याच्याकडून एक धारदार लोखंडी तलवार जप्त करण्यात आली. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल योगेश पाटील यांच्या फिर्यादीवरून गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संत तुकाराम महाराज बीजनिमित्त कीर्तन सप्ताह

प्रतिनिधी । धरणगाव

**संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या बीजनिमित्त मराठे गल्ली, जय बजरंग चौक, धरणगाव येथे माऊली वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर हभप. महंत भगवानदासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह भक्तिमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

सप्ताहाची सुरुवात गुरुवार, दि.२६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. समारोप गुरुवार, दि. ५ मार्च, रोजी होणार आहे. या कालावधीत भाविकांसाठी सप्ताहादरम्यान पहाटे ५ ते ६ काकड आरती, सायं. ५ ते ६ हरिपाठ, तसेच रात्री ७ ते १० या वेळेत हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. यात हभप. प्रल्हाद महाराज (कळमसरे), हभप. नाना महाराज (दोंडाईचा), हभप. गोकुळ महाराज (खिरवड), हभप. किशोर महाराज (मोरदड), हभप. अशोक महाराज (शिरपूर), हभप. पंकज महाराज (एकतास), हभप. स्वप्नील महाराज (गिरड) आणि काल्याचे कीर्तन हभप. सावता महाराज (मोहाडी) यांचे होणार आहे. ५ मार्चला महाप्रसादाचे

# चोपड्यात आजपासून प्रियजन स्मृती व्याख्यानमाला

प्रतिनिधी ।चोपडा

**महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चोपडा शाखेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही तीन दिवसीय प्रियजन स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन २६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. पंकज नगर परिसरातील पंकज बालसंस्कार केंद्राच्या आवारात दररोज रात्री ८.३० वाजता ही व्याख्यानमाला रंगणार असून महाराष्ट्रातील नामवंत व्याख्याते विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.**

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प २६ फेब्रुवारी रोजी पुणे येथील डॉ. मिलिंद सरदार 'आनंदी आणि सुदृढ जीवनाची गुरुकिल्ली' या विषयावर गुंफणार आहेत. २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिनानिमित्त जळगावचे व्याख्याते रामचंद्र पाटील माझ्या मराठीची बोलू कौतुके या विषयावर विचार मांडतील. समारोप २८ फेब्रुवारी रोजी नागपूरचे साहित्यिक प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांच्या जिंकण्याला कुठे तारखा पाहिजे? या प्रेरणादायी व्याख्यानाने होणार आहे. या व्याख्यानमालेस हरताळकर हॉस्पिटलचे डॉ.विकास हरताळकर, जिल्हा बँक संचालक घनश्याम अग्रवाल, पंकज समूहाचे डॉ. सुरेश बोरोले यांच्यासह व अन्य मान्यवरांनी प्रायोजकत्व स्वीकारले आहे.व्याख्यानाचा लाभ शहरवासीयांनी घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# धरणगावात संत गाडगे महाराज जयंती साजरी

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील जय भवानी मित्र मंडळ, लांडगे गल्ली परिसर तर्फे कर्मवीर राष्ट्रसंत संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समाजप्रबोधन, स्वच्छता आणि सेवाभावाचा अखंड संदेश देणाऱ्या संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक स्मरण केले.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांच्या हस्ते पूजन विधी पार पडला. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत गाडगे महाराजांच्या विचारांना अभिवादन केले.

संत गाडगे महाराज यांनी आयुष्यभर स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण व समाजसेवा यांचा पुरस्कार केला. गरीब, वंचित, गरजू घटकांसाठी त्यांनी शिक्षण, निवारा, धर्मशाळा आणि जनजागृतीची कामे उभारून समाजकार्याचा आदर्श निर्माण केला. याप्रसंगी चर्मकार समाजाचे नेते भानुदास विसावे, विजय महाजन, नगरसेवक निलेश चौधरी, पप्पू भावे, भागवत चौधरी, विलास महाजन, लक्ष्मण महाजन, शिंदे गटाचे शहरप्रमुख धीरेंद्र पुरभे, माजी नगरसेवक वासुदेव चौधरी, डॉ. लीलाधर बोरसे, छोटू जाधव, पप्पू कंखरे, पवन महाजन, चेतन जाधव, किरण अग्निहोत्री, प्रकाश जाधव, परीट समाजाचे युवा नेते विनोद रोकडे, गजानन महाजन, अशोक जाधव, रवींद्र जाधव कमलेश बोरसे, नंदकिशोर पाटील, विनोद जाधव, वाल्मीक पाटील, प्रकाश पाटील, कैलास धनगर, महेश पाटील, संजय पवार, नागराज पाटील, श्याम पाटील, भिकन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### तळवेल येथील नेहरू विद्यालयात चिंतन दिवस

प्रतिनिधी । भुसावळ

तालुक्यातील तळवेल येथील नेहरू विद्यालयामध्ये चिंतन दिवस स्काऊट गाईड यांनी प्रार्थना व झेंडा गीताने सुरवात करून साजरा केला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.एस. अहिरे होते. प्रास्ताविकात एम.एन. इधे यांनी बेडन पॉवेल व लेडी बेडन पॉवेल यांच्या जिवनाविषयी परिचय करून माहिती दिली. बेडन पावेल यांचे गीत एस.एस. सरोदे यांनी घेतले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक एस.सी. पाटील उपस्थित होते.

# ग्रामीण रुग्णालय समितीवर डॉ. डिगंबर महाले यांची निवड

प्रतिनिधी । अमळनेर



येथील ग्रामीण रुग्णालय सनियंत्रण व सल्लागार समितीची नव्याने रचना करण्यात आली. यावर नगरसेवक डॉ. डिगंबर विठ्ठल महाले यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली. शासनाच्या वतीने अवर सचिव संजय महाडेश्वर यांनी आदेश जारी केले होते. त्यानुसार ग्रामीण रुग्णालय अमळनेर येथील वैद्यकीय अधीक्षक (वर्ग-१) यांनी समितीची रचना जाहीर केली. समितीच्या अध्यक्षपदी आ. अनिल पाटील तर सदस्य म्हणून पंचायत समितीचे दोन सदस्य तथा प्रशासक, नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, एनजीओ प्रतिनिधी डॉ. भारती पाटील, पद्मजा पाटील व विक्रांत भास्करराव पाटील यांचा समावेश आहे.

# 'प्रताप'च्या विद्यार्थ्यांनी केला भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास

## ➲ राज्यशास्त्र विभागाचा उपक्रम; गांधीतीर्थ व अजिंठा लेणीस शैक्षणिक भेट

प्रतिनिधी । अमळनेर

**राज्यशास्त्र विभागाचा उपक्रम; गांधीतीर्थ व अजिंठा लेणीस शैक्षणिक भेट**

**अमळनेर, दि.२५ (प्रतिनिधी): येथील खानदेश शिक्षण मंडळ संचालित प्रताप महाविद्यालय अमळनेरच्या राज्यशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी गांधीतीर्थ व अजिंठा लेणी येथे एकदिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून अध्ययन व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.**



विद्यार्थ्यांनी प्रथम गांधी तीर्थ जळगाव येथे भेट दिली. येथे गांधी जीवनतत्त्वज्ञान, गांधींचे कार्य, मोहन ते महात्मा या प्रवासावरील ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरण, खोज गांधीजी की मासिक तसेच विविध भाषांतील साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. डिजिटल माहितीपट आणि चित्रप्रदर्शनांच्या माध्यमातून सत्य, अहिंसा, स्वदेशी व स्वावलंबन या चतु:सूत्रीचा अभ्यास करण्यात आला. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्म साक्षात्कार व नैतिक कर्तव्याची जाणीव अधिक दृढ झाली. दुपारनंतर विद्यार्थ्यांनी अजिंठा लेणीची पाहणी केली. वाघूर नदीच्या खोऱ्यातील नैसर्गिक सौंदर्य यांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. भारतीय कला, संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचे जिवंत दर्शन या सहलीतून घडले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. विभागप्रमुख डॉ. विजय तुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संदीप नेरकर, डॉ. सुनील राजपूत, डॉ. राखी घरटे, प्रा. दिलीप तडवी व डॉ. हर्ष नेतकर यांनी सहलीसाठी परिश्रम घेतले.

# पारोळा येथे शासकीय कर्मचारी संघटनांचे आंदोलन



प्रतिनिधी । पारोळा

येथे शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना अंतर्गत कनिष्ठ सहाय्यक वरिष्ठ सहाय्यकांचा विविध मागण्यांसाठी शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, राज्याध्यक्ष अशोक डहाळे व जिल्हास्तरीय अध्यक्ष प्रमोद काळे यांचे नेतृत्वाखाली दि.२३ फेब्रुवारी पासून पारोळा पंचायत समिती आवारात बेमुदत संप सुरू आहे. दि.१२ डिसेंबर २०२५ रोजी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात कनिष्ठ अधिकारी हे नामाभिकरण करणे. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या मागवण्यात आलेल्या होत्या. कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक यांचे चौथ्या वेतन आयोगापासून वेतनातील तफावत दूर करण्यासंदर्भात वेळोवेळी वेतन त्रुटी शासनाने दूर केलेल्या आहेत. तशीच वेतन त्रुटी दूर करावी. पदोन्नतीमध्ये लांब पल्ल्याने टप्प्याटप्प्याने पदोन्नती देणे टाळावे. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.